# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्र-३३९/२०२४** **दिनांक-०३/०९/२०२४.**

## "Work From Home" नावाखाली ऑनलाईन यु टुब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल/मुव्ही रेटींग मध्ये गुतंवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीतील 1,07,000/-रुपये रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात काशिगांव पोलीस ठाण्यास यश.''

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिगांव पोलीस स्टेशन परीसरात राहणारे श्रीमती रोशनी किवकुमार कनोजीया, वय ३० वर्ष, रा. मिरारोड पुर्व **"Work From Home"** नावा खाली ऑन लाईन युट्युब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल/मुव्ही रेटींग यांना लाईक अथवा गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळविण्याचे आमिष दाखवुन तक्रारदार यांची **1,07,000/-** रुपयांची फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमिरा पो.ठाणे येथे गुन्हा रजि.नं.। ७५/२०२४, भादंवी. कलम ४२०, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमूद तक्रारी बाबत तात्काळ गुन्हा दाखल करुन घेवून तक्रादार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता, तक्रादार यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्याअनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाकडुन तक्रादार यांची रक्कम परत मिळविण्या करीता काशिगाव पोलीस ठाणेचे अधिकारी/अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने तक्रादार **श्रीमती रोशनी किवकुमार कनोजीया, वय ३० वर्ष, रा. मिरारोड पुर्व** यांची फसवणुक झालेली **1,07,000/-**रुपये रक्कम त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.

**<u>अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...</u>**

- Telegram Channel, facebook, Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवुनका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी काही लोकांचे बॅक स्टेटमेंट मध्ये त्यांना फायदा झालेली रक्कम दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात असतो.
- Work From Home नावाखाली Online You Tube Video Like Tasks, Hotel/Movie Rating या सारखा गुंतवणुक करण्याऱ्या बनावट जाहिरातींना बळी पडू नये.
- कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंक वर क्लिक करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायद्याने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस,

सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.inअथवा1930 या हेल्प लाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परि-०१, मिरारोड, श्री. विजयकुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राहुल सोनवणे, पोलीस निरीक्षक, पोहवा/०७१२८ सचिन पाटील यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट - www.cybercrime.gov.in**

**-----------ooooo---------**